अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७७/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/७४८८ दि.११/१०/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७७/२०२३

प्रति,

श्री.रमेश विष्णू खामकर,

२६४ नारायण पेठ,

पुणे-४११०३०

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.रमेश विष्णू खामकर, २६४ नारायण पेठ, पुणे-४११०३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.१७/८/२०२३ रोजी (आ.क्र.८५०९, दि.१७/०८/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/५४१८, दि.२२/०८/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १७/८/२०२३ | १७/८/२०२३ | १६/९/२०२३ | २२/८/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने अर्ज केला असल्याचे अर्जात नमूद करुन दि.२०/९/२०२३ रोजी (आ.क्र.१०३८७ दि.२०/९/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २५/०९/२०२३ | २५/०९/२०२३ | २०/१०/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक १०/१०/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.०९/१०/२०२३ दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले होते. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने अर्ज केला", असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/५४१८, दि.२२/८/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| मुद्दा.क्र. | विचारलेली माहिती | माहिती |
|---|---|---|
| १. | श्रीमती अस्मिता तांबे भवानी पेठ क्षेत्रीय अधिकारी यांची मुदत १४ जुलै २०२३ रोजी संपुष्टात आलेली आहे. मनपा आयुक्त यांनी शासनास मुदतवाढीचे पत्र पाठविले त्याची प्रत. | प्रत सोबत जोडली आहे. |
| २. | भवानी क्षे. का. व कर आकारणी व कर संकलन विभाग किंवा सा. प्र. विभाग यापैकी त्याचे मुदतवाढी संबंधीचे मनपा आयुक्ताकडे पाठविलेले निवेदनाची प्रत. | सदर माहिती भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय किंवा कर आकारणी कर संकलन विभागाकडून मिळू शकेल. सदर अर्ज भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय व कर आकारणी कर संकलन विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. |
| ३. | श्री. प्रल्हाद पाटील वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी याची ड्युटी लिस्ट. | अर्जदार यांनी विचारल्याप्रमाणे सदर माहिती आरोग्य विभागाकडून उपलब्ध होऊ शकेल. तथापि सदर अर्ज आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. |
| ४. | ड्युटी लिस्ट नसल्यास संयुक्त करणासह सविस्तर माहिती मिळावी. | अर्जदार यांनी विचारल्याप्रमाणे सदर माहिती आरोग्य विभागाकडून उपलब्ध होऊ शकेल. तथापि सदर अर्ज आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. |
| ५. | श्री. प्रल्हाद पाटील सर साईट व्हिजिटला जातात. ते आल्यापासून त्यांनी साईट व्हिजिट केलेले दवाखाने याची नावे. व त्यानुसार वरिष्ठांकडे ठेवलेले अहवाल याची प्रत. | अर्जदार यांनी विचारल्याप्रमाणे सदर माहिती आरोग्य विभागाकडून उपलब्ध होऊ शकेल. तथापि सदर अर्ज आरोग्य विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. |

मूळ माहिती अधिकार अर्जामधील माहितीवर उत्तर न मिळाल्याने अपिल केल्याबाबत सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी नमूद केले. मुद्दा क्र.२ ची माहिती आस्थापना विभागाकडे असल्याने अभिलेखे अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. मुद्दा क्र.३ ते ५ ची माहिती आरोग्य विभागाशी संबंधित असल्याने अपिलासाठी अर्ज वर्ग करणे आवश्यक असल्याबाबत त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्ज वर्ग केले असल्याचे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

# आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मुद्दा क्र.२ ची माहिती विनामूल्य अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. मुद्दा क्र.३ ते ५ आरोग्य विभागाशी निगडीत असल्याने अपिल अर्ज अपिल अधिकारी, आरोग्य विभाग यांचेकडे अर्ज वर्ग करण्यात आलेला आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.७७/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

12/10/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.